# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ०९ एप्रिल २०१६

- **महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दुर्मिळ पुस्तकं आणि चित्रांचे प्रदर्शन**
- **विद्यापीठात जयंती सप्ताहाला सुरुवात**

मुंबई – २०० हून अधिक दुर्मिळ पुस्तकं, चित्रं, नाणी, दुर्मिळ लेख, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेली विविध दुर्मिळ पत्रे, युनिव्हर्सिटी ऑफ लंडन ग्रंथालयाचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ओळखपत्र, लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्स येथील ११ ऑक्टोबर १९१६ मधील विद्यार्थी पास, ७ जानेवारी १९३१ ला लंडनहून बडोदा येथील महाराजाना लिहलेले पत्र, वसंत व्याख्यानमालेच्या निमंत्रणासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना चिटणीस यांनी लिहलेले १७ एप्रिल १९२७ रोजीचे पत्र, कोलंबिया विद्यापीठाचे २७ ऑक्टोबर १९२० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उद्देश्युन लिहलेले पत्र, राजगृह - दादर येथून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शंकरदास बर्वे यांना ३० सप्टेंबर १९३६ ला लिहलेले पत्र, तर समता या पाक्षिकाचा २९ जून १९२८ चा पहिला अंक, रविवार ३ एप्रिल १९२७ चा बहिस्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक, मुकनायक, जनता साप्ताहिकाचे ऑक्टोबर १९५६ चे हिरक महोत्सवी विशेषांक अशा विविध आणि दुर्मिळ लेखांचा खजिना आज मुंबई विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरु ग्रंथालयात खूला करण्यात आला.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती उत्सवानिमित्त मुंबई विद्यापीठामध्ये ९ एप्रिल ते १४ एप्रिल २०१६ या दरम्यान महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या जयंती सप्ताहाच्या पहिल्या दिवशी महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी व त्यांच्यावरील लिहलेली दुर्मिळ पुस्तकं व चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उदघाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी केले.

या प्रदर्शनाचा एक भाग म्हणून जगभरातील अनेक दुर्मिळ चित्रांचे प्रदर्शनही भरविण्यात आले आहे. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना प्रदान करण्यात आलेला भारतरत्न पुरस्कार, त्यांच्याकडील असलेली दुर्मिळ साहित्य, त्यांची गिटार, त्यांची लेखणी, अभ्यासखोली, पोस्टेज स्टॅम्प, भारतीय डाक – तार विभागाने १४ एप्रिल १९६६ ला जारी केलेले पोस्टकार्ड अशा अनेक दुर्मिळ चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. दोन दिवस चालणारे हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून इच्छुकांनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट देण्याचे आवाहन मुंबई विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. ( सोबत – पुस्तक प्रदर्शनामध्ये ठेवण्यात आलेल्या पुस्तकांच्या यादीसाठी लिंक :
https://docs.google.com/viewer?a=v&pid=sites&srcid=ZGVmYXVsdGRvbWFpbnxqYXlhbnRpc2FwdGFofGd4OjU4ZTI5NzAyOWJiZmEzNTA

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क , प्रकाशन, सांख्यिकी )